(SJIF)Impact Factor-7.675 ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed Indexed

Multidisciplinary International Research Journal

October - 2020

SPECIAL ISSUE-CCXLVII ( 247)

# Ideology of Mahatma Gandhi

Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Gest Editor:
Dr. R.K.Ippar
Principal
Vaidyanath College Parli- Vaijnath,
Dist. Beed.

Dr. B.K. Shep,
Head, Dept. of History

Dr. R.D. Rathod,
Head, Dept. of Sociology

Prof.(Dr.) V.B. Gaikwad,
P.G. Coordinator, Science

Executive Editor:
Jawahar Education Society's Vaidyanath College Parli- Vaijnath,
Dist. Beed.

The Journal is indexed in:

Scientific Journal Impact Factor (SJIF)

Cosmos Impact Factor (CIF)

International Impact Factor Services (IIFS)

Impact Factor – 7.675 ISSN – 2278-9308

# B.Aadhar

## Peer-Reviewed Indexed

### *Multidisciplinary International Research Journal*

**October - 2020**

**SPECIAL ISSUE – CCXLVII ( 247)**

# Ideology of Mahatma Gandhi

**Prof. Virag.S.Gawande**
**Chief Editor :**
**Director**
**Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.**

**Dr. R.K.Ippar**
**Gest Editor:**
**Principal**

**Dr. B.K. Shep,**
Head, Dept. of History

**Dr. R.D. Rathod,**
Head, Dept. of Sociology

**Prof.(Dr.) V.B. Gaikwad ,**
P.G. Coordinator, Science

**Executive Editor:**
**Jawahar Education Society's Vaidyanath College Parli- Vaijnath, Dist. Beed.**

## Aadhar International Publication

For Details Visit To : www.aadharsocial.com

© All rights reserved with the authors & publisher

| | | |
|---|---|---|
| 21 | महात्मा गांधी यांना अभिप्रेत असणारी सत्याग्रहाची साधणे. श्री विलास सोमाजी पवार | 81 |
| 22 | महात्मा गांधी आणि १९४२ चे आंदोलन डॉ. संदिप व्ही. भुरले | 84 |
| 23 | गाँधी जी के सत्याग्रह आंदोलन डॉ.प्रशांत कुमार | 87 |
| 24 | सत्याग्रही महात्मा गांधी प्रा. जयंत विरुळकर | 91 |
| 25 | महात्मा गांधी यांचे शिक्षणविषयक विचार डॉ. श्री. निळकंठ रामचंद्र व्यापारी | 97 |
| 26 | महात्मा गांधीजींचे शैक्षणिक विचार सौ चित्ररेखा रविंद्रनाथ जाधव | 100 |
| 27 | महात्मा गांधी यांचे सत्याग्रह विषयक विचार प्रा.बी.आय.परदेशी | 107 |
| 28 | म. गांधी यांच्या विचारांची समकालीन उपयुक्तता प्रा. ए. बी. भावसार | 110 |
| 29 | गांधी आंदोलनातील स्त्रिया बोरसे विनोद बाबुराव | 115 |
| 30 | खेड्याकडे चला: महात्मा गांधीजींचे कालातीत विचार प्रा.मनोज बी.देवकर | 120 |
| 31 | महात्मा गांधी यांच्या संकल्पनेतील ग्रामस्वराज्य आणि आजची स्थिती डॉ.कालिदास मारुती भांगे | 122 |
| 32 | सर्वोदय एक चिंतन प्रा. डॉ. शिवराज पाटील | 129 |
| 33 | महात्मा गांधी यांचे शैक्षणिक विचार काल आणि आज डॉ. संदिप शंकरराव देसाई | 132 |
| 34 | राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे स्वच्छते विषयक विचार प्रा रेवणनाथ बी. काळे | 135 |
| 35 | महात्मा गांधी आणि त्यांचे साहित्य रू एक अभ्यास डॉ. रामहरी मधुकर सूर्यवंशी | 139 |
| 36 | महात्मा गांधींचे सत्य अहिंसेबाबतचे विचार प्रा. सय्यद आर. आर. | 142 |
| 37 | म.गांधीजींची सत्याग्रहाची संकल्पना प्रा. घिमघिमे किरणकुमार मोहन | 146 |
| 38 | महात्मा गांधी यांचे शैक्षणिक विचार आणि वर्तमानस्थिती प्रा. पितांबर व्ही. पिसे | 148 |
| 39 | महात्मा गांधी यांच्या विचाराची ऐतिहासिक प्रासंगिकता : एक अभ्यास प्रा.डॉ.प्रकाश फड | 151 |
| 40 | भारतीय स्वातंत्र्य लढ्यत महात्मा गांधी यांचे योगदान प्रा. किशोर शेषराव चौरे | 155 |
| 41 | महात्मा गांधींचे स्त्रियांविषयीचा मानवतावादी दृष्टीकोन डॉ. जयश्री महाजन /कांचन हिलाल देसले | 158 |

# राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे स्वच्छते विषयक विचार

प्रा रेवणनाथ बी. काळे
समाजशास्त्र विभाग र.भ.अट्टल महाविद्यालय गेवराई, जिल्हा-बीड

**प्रस्तावना:**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी म्हटले आहे की,'स्वच्छता हे स्वातंत्र्य पेक्षा अधिक महत्त्वाचे आहे.'या वरून आपल्याला लक्षात घेता येते की स्वच्छता हा घटक अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. कारण स्वच्छतेचा थेट संबंध आरोग्याशी आहे.ज्या देशात स्वच्छता व आरोग्य चांगले आहे ते देश विकासामध्ये पुढे आहेत किंवा त्या देशाचा विकास हा त्या देशातील स्वच्छतेवर व आरोग्यावर अवलंबून आहे. म्हणून स्वच्छता या घटकाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. स्वातंत्र्य चळवळीपासून अनेक समाजसुधारकांनी स्वच्छतेविषयी चळवळी चालवल्या आहे. म्हणजेच या समाज सुधारकाना स्वच्छतेचे महत्व कळले होते. मुख्यत्वेकरून राष्ट्रपिता महात्मा गांधी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, संत गाडगेबाबा, सूर्यकांत पारीख, डॉ.बिंदेश्वर पाठक यांनी उल्लेखनीय कार्य केलेले आहे.

**शोधनिबंधाचा उद्देश:**

1. महात्मा गांधी यांचे स्वच्छता विषयक विचार समजून घेणे.
2. भारतातील स्वच्छता विषयक कार्यक्रमांचा आढावा घेणे.
3. कोरोना व स्वच्छता संबंध अभ्यासणे.

**तथ्य संकलन पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंध साठी दुय्यम तथ्य संकलन पद्धतीचा अवलंब केलेला असून त्यासाठी संदर्भ ग्रंथ, पुस्तके, मासिके, वर्तमानपत्र आणि इंटरनेटवर उपलब्ध असलेल्या माहितीचा आधार घेण्यात आलेला आहे.

**महात्मा गांधी यांचे स्वच्छता विषयक विचार:**

'जर व्यक्ती स्वच्छता ठेवत नसेल तर तो स्वस्थ राहू शकत नाही.'या वरून आपल्याला असे दिसून येते की, स्वच्छता आणि आरोग्य यांचा खूप जवळचा संबंध आहे. जिथे अस्वच्छता असेल तिथे आरोग्य वास करीत नाही.जिथे चांगले आरोग्य नाही त्या समाजाचा आणि देशाचा विकास होत नाही. हे महात्मा गांधींनी ओळखले होते.त्यामुळे 1915 साली गांधीजींनी आफ्रिकेतून भारतात परतल्यानंतर संपूर्ण देशाची पाहणी केली,त्यानंतर त्यांच्या असे लक्षात आले की भारत अस्वच्छतेचे माहेरघर आहे..ते दूर करण्यासाठी त्यांनी स्वच्छ भारताचे स्वप्न बघितले. नद्यांचे पावित्र्य आम्ही जपतो, श्रद्धेने त्यात स्नान करतो, पूजा करतो त्याच नद्यांचे पाणी अस्वच्छ किंवा प्रदूषित करताना आम्हाला काहीच वाटत नाही. यातून अनेक आजारांनी देशात थैमान घातले आहे आशी टिका महात्मा गांधी स्वच्छतेबाबत करतात.

स्वच्छतेला जीवनात प्राधान्य असले पाहिजेत. हे आपल्या आचारा विचार आणि कृती मधून अनेकदा गांधीजींनी दाखवून दिले आहे. आफ्रिकेत असताना त्यांनी स्वच्छता व आरोग्य विषयावर लेखन केले. मैला स्वतःहून वाहून नेऊ लागले, साफसफाई करू लागले. 'राजकोट मध्ये जलजन्य रोगांनी थैमान

घातले तेव्हा त्यांनी घरोघरी जाऊन सांडपाणी निस्सारण आणि आरोग्यासाठी प्रबोधन केले.' '1901 मध्ये काँग्रेसच्या अधिवेशनात सहभागी झालेले असताना त्यांना जाणवले की परंपरेने अस्पृश्य जातीच्या लोकांकडून मैला वाहतूक, स्वच्छतागृहांची साफसफाई करून घेतली जाते या जातीभेदावर महात्मा गांधी यांनी नाराजी व्यक्त केली.' आणि स्वच्छतागृहांची साफसफाईचे काम स्वतः हाती घेतले व प्रत्येकाने स्वतःची स्वच्छता स्वतः केली पाहिजे यासाठी आग्रह धरला. महात्मा गांधीजी दृष्टी मानवतावादी होती. त्यांनी स्वच्छतेला केंद्रबिंदू माणून जवळपास प्रत्येक संमेलनात आपल्या भाषणात स्वच्छतेच्या मुद्द्यावर प्रकाश टाकलेला दिसून येतो. महात्मा गांधी स्वच्छतेच्या प्रति गंभीर होते त्यामुळेच गांधीजींच्या विचारांमध्ये स्वच्छता हा घटक अत्यंत महत्त्वपूर्ण सामाजिक मुद्दा होता. प्रत्येक व्यक्तीने आपापले स्वच्छतेचे,साफसफाईचे काम स्वतः करायला हवे. स्वच्छता, साफसफाई कोणत्याही एका विशिष्ट वर्गासाठी नसली पाहिजे म्हणून त्यांनी सर्व कार्यकर्त्यांना सांगितले की आपल्या गावाची स्वच्छतेबाबत आपण जागृत असले पाहिजे व इतरांनाही ही जागृत केले पाहिजे. गावांमध्ये पसरणाऱ्या आजारांना रोखण्यासाठी पावले उचलणे आवश्यक आहे. त्यासाठी शाळा, महाविद्यालय या शिक्षण प्रक्रियेतील अभ्यासक्रमात स्वच्छतेला समावेश करण्यासाठी सुद्धा त्यांनी जोर दिला होता. महात्मा गांधी लहानपणापासूनच भारतीयांमध्ये स्वच्छतेच्या प्रति उदासीनता दिसत होती. त्यांनी सभ्य आणि विकसित मानव समाजासाठी व देशासाठी स्वच्छतेला मानदंड यामध्ये आवश्यक मानले. त्यामुळे त्यांना असे वाटले की पाश्चिमात्य देश स्वच्छतेमुळे पुढे आहेत म्हणून त्यांनी दक्षिण आफ्रिकेतील दिवसापासुनच भारतामध्ये येऊन आपल्या पूर्ण जीवन काळात निरंतरपणे स्वच्छतेच्या प्रति लोकांमध्ये जागृती आणण्याचे काम केले.1895 मध्ये ब्रिटिश सरकारने दक्षिण आफ्रिकेमध्ये भारतीय व्यापारयांसोबत अस्वच्छतेच्या आधारावर भेदभाव केला होता. तेव्हापासून महात्मा गांधी नेहमीच साफसफाई, स्वच्छतेसाठी प्रयत्न करत होते. महात्मा गांधी यांनी सर्व नागरिकांना स्वच्छता ठेवण्या संबंधात शिक्षणाच्या माध्यमातून राष्ट्राला उत्कृष्ट संदेश दिलेला आहे.त्यांनी म्हटले आहे की स्वच्छ भारताचे स्वप्न बघितले पाहिजे, त्यासाठी भारतातील सर्व नागरिकांनी एकत्र येऊन स्वच्छतेचे कार्य केले पाहिजे.

**भारतातील स्वच्छता विषयक कार्यक्रम :**

ग्राम स्वच्छतेचे महत्व महात्मा गांधी यांनी त्या काळातच ओळखले होते आणि त्याची सुरुवात त्यांनी स्वतःपासून केली होती.आज हे सूत्र स्वीकारून देश-विदेशात स्वच्छता मोहीम राबवली जात आहे. भारतात विद्यमान सरकारने तसेच त्यापूर्वीच्या राज्यातील सरकारने वेगवेगळया पद्धतीने पण गांधीजीच्या स्वच्छतेच्या मंत्राचा आधार घेऊन मोहीम सुरू केल्या आहेत.

भारत सरकारने 1986 मध्ये केंद्रीय ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम सुरू करून देशभर लागू केला.या योजनेचा प्रचार व प्रसार होऊ शकला नाही ही योजना होण्याच्या मार्गावर असताना सन 1999-2000 मध्ये संपूर्ण स्वच्छता अभियान की योजना सुरू झाली. या योजनेत माहिती शिक्षण व संवाद यावर भर देण्यात आला. या योजनेचा प्रचार केरळ, गुजरात, महाराष्ट्र, हरियाणा, पश्चिम बंगाल या राज्यांमध्ये प्रभावीपणे करण्यात आला.परंतु हवे तसे परिणाम झाले नाही. 2012 मध्ये संपूर्ण स्वच्छता अभियान याचे नामकरण करून निर्मल भारत अभियान करण्यात आले. तसेच प्रत्येक राज्यामध्ये स्वच्छतेच्या वेगवेगळया योजना कार्यक्रम लागू केले. जसे महाराष्ट्रात सन 2000 पासून संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान सुरु केले. या पद्धतीने संपूर्ण देशभर स्वच्छतेच्या वेगवेगळया योजना राबविल्या जाऊ लागल्या. वैयक्तिक पातळीवर डॉ. बिंदेश्वर पाठक यांनी सन 1970 पासून सुलभ शौचालयाची चळवळ उभी करून संपूर्ण

देशात सार्वजनिक ठिकाणी सुलभ शौचालय उभी केली. भारत सरकारने पेयजल व स्वच्छता मंत्रालयाची स्वतंत्र स्थापना केली. यापूर्वी ग्रामीण विकास मंत्रालयाच्या अंतर्गत हा विभाग चालविला जात होता. ग्रामीण भागातील लोकांना वैयक्तिक शौचालय बांधण्यास लावणे यासाठी अनुदान देणे स्वच्छतेसाठी लोकांच्या जनजागृती करण्यावर या अभियानात भर दिला जातो. यानंतर भारत सरकारने दि.2 ऑक्टोबर 2014 पासून देशात स्वच्छ भारत अभियान असे योजनेचे नामकरण करून स्वच्छतेची व्यापकता वाढविण्याचा प्रयत्न केला आहे.स्वच्छ भारत अभियान चा उद्देश केवळ आपल्या अवतीभवतीची स्वच्छता करणे एवढेच नाही तर सर्व नागरिकांनी सहभागी होऊन वृक्ष लागवड, कचरा मुक्त पर्यावरण, शौचालयाची सुविधा उपलब्ध करून देऊन एक स्वच्छ भारताचे निर्माण करणे आहे.

**सद्यस्थिती:**

'सार्वजनिक स्वच्छता सार्वजनिक स्वच्छता हे सार्वजनिक आरोग्याचे एक महत्वाचे अंग आहे. रोगांचा प्रतिबंध व त्यावर नियंत्रण करून पर्यावरणाचे नियमन करणाऱ्या यंत्रणा प्रयत्नशील असतात.असे प्रयत्न सार्वजनिक स्वच्छतेचा भाग असतात. सार्वजनिक स्वच्छतेत व्यक्तिगत स्वच्छताही अंतर्भूत असते. कारण व्यक्तिगत स्वच्छतेमुळे समाजाचे रोगापासून रक्षण करण्याच्या कामाला मदत होते.' यावरून सद्यस्थितीत जगात कोरोना व्हायरस या आजाराने थैमान घातले आहे. कोरोना व्हायरस संक्रमण किंवा प्रसाराचे मुख्य कारण म्हणजे शिंकणे किंवा खोकल्याच्या माध्यमातून एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे संक्रमण होते. परंतु या आजारापासून किंवा या आजाराला नियंत्रित करण्यासाठी स्वच्छता व स्वच्छतेचे उपाय अत्यंत महत्त्व आहे. हेच उपाय जगभर समोर आले आहे, व कोरोनाव्हायरस ने स्वच्छतेचे महत्व अधोरेखित केले आहे. स्वच्छ पाण्याने हात धुने कोरोना संक्रमण रोखण्यासाठी महत्त्वपूर्ण उपाय मानला गेला आहे. साबण आणि स्वच्छ पाण्याने हात धुतल्यास कोरोना व्हायरस संक्रमण होण्याचा धोका टाळता येऊ शकतो. तसेच ज्या व्यक्तीला शिंका किंवा खोकला येत असेल तर त्या व्यक्तीने शिंकताना व खोकताना तोंडा - नाकाला रूमाल लावावा. जेणेकरून आपल्यापासून इतरांना त्रास होणार नाही.त्यासाठी वैयक्तिक स्वच्छतेच्या सवयी या महत्त्वाच्या ठरतात. त्याचबरोबर रस्त्यावर,तसेच आपण ज्या ठिकाणी काम करतो त्या ठिकाणी थुंकणे या सवयी जर आपण टाळल्या तर आपण इतरांना कोरोनाव्हायरस या आजाराबरोबरच इतर आजारांना होण्यापासून टाळू शकतो.'जागतिक आरोग्य संघटनेच्या एका अहवालानुसार असे सांगितले गेले की,भारतातील लोकसंख्येने जेवणापूर्वी साबणाने हाथ स्वच्छ केल्यास जवळपास 50 प्रतिशत आजार टाळता येऊ शकेल.'स्वच्छता हे असे कार्य आहे की, ते स्वतः आपण करायला हवे. परंतु त्यासाठी सुद्धा कार्यवाही,दंड,शिक्षा करणे भाग पडत आहे. महात्मा गांधी यांनी म्हटले आहे की,'स्वच्छता आपल्या आचरणात याप्रकारे सामील करा की त्याची सवय होईल'.त्यामुळे वैयक्तिक स्वच्छता व सार्वजनिक स्वच्छता ठेवणे किंवा त्या सवयी आत्मसात करून जर आपण अस्वच्छता केली नाही तर अशा अनेक आजारांपासून समाजाला आपण सुरक्षित ठेवू शकतो. म्हणूनच वैयक्तिक स्वच्छतेबरोबर सार्वजनिक स्वच्छता ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

**सारांश :**

वरील अध्यानावरून असे दिसून येते की, स्वतःसाठी,समाजासाठी आणि पूर्ण जगासाठी स्वच्छता महत्वपूर्ण आहे. त्यामुळे सर्वांमध्ये स्वच्छतेविषयी जागरूकता निर्माण करून स्वच्छतेसाठी सर्वांनी आप आपली जबाबदारी पार पडली पाहिजे.स्वच्छतेच्या अभियानामध्ये सर्वांनी कृतीशील सहभाग घेऊन वैयक्तिक व सार्वजनिक अस्वच्छता दूर होऊन भारतीयांचे आरोग्य चांगले राहून समृद्धी निर्माण होईल. तेंव्हाच खऱ्या अर्थाने महात्मा गांधी यांनी बघितलेल्या स्वच्छ स्वप्नातील भारताला मूर्त स्वरूप प्राप्त होउन विकसीत समाज निर्माण होऊ शकेल.

संदर्भ :

1. शुक्ल अरविंद , स्वच्छ भारत अभियान, बुक पब्लिकेशन्स लखनौ, 2016.
2. Akram, Mohmmad, Sociology of Sanitation, Kalpaz Publication, New Delhi, 2015.
3. जाधव, श्रीराम, गांधीजी आणि सामाजिक समता, महात्मा गांधी अध्यासन केंद्र, औरंगाबाद, 2009.
4. योजना जानेवारी, 2015.
5. कुरुक्षेत्र, ऑक्टोबर 2017.
6. vishwkosh.marathi.gov.in.
7. hindi.indiwaterportal.org.